● Date of Publication : गुरुवार, १८ जानेवारी २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily. •••••• आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-2020/RNI No.14922

# कर्जमुक्ती, दीडपट हमीभावासंदर्भात संसदेत विधेयके आणणार : शेट्टी



**मुंबई (प्रतिनिधी)**: देशातील शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमुक्ती मिळावी आणि उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळावा यासाठी दोन स्वतंत्र खासगी विधेयके आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात संसदेत मांडणार असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी बुधवारी (ता.१७) सांगितले. ते मंत्रालयात पत्रकारांशी बोलत होते.

खासदार राजू शेट्टी म्हणाले, की गेल्या २० आणि २१ नोव्हेंबरला देशभरातील १८८ शेतकरी संघटनांनी राजधानी दिल्लीत किसान मुक्ती आंदोलन सुरू केले आहे. यात शेतकरी आत्महत्येवरही एक विशेष सत्र होते. या वेळी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात लोकसभेत शेतकऱ्यांच्या व्यथांची दखल घेतली जात नाही अशी खंत व्यक्त केली. त्यानंतर शेतकऱ्यांशी संबंधित दोन विधेयके आम्ही किसान मुक्ती आंदोलनात सादर केली. देशातील शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमुक्ती देण्याचा अधिकार २०१७ आणि उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याचा अधिकार अशी दोन विधेयके सादर केली. या विधेयकांचा मसुदा देशभर घेऊन जावे. शेती क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करून, वेबसाइटद्वारे या मसुद्यावर सूचना मागवून त्यातून अंतिम मसुदा तयार करावा, असे ठरले.

श्री. शेट्टी पुढे म्हणाले, त्यासाठी किसान मुक्ती संसदेने दोन समित्याही स्थापन केल्या आहेत. त्यानंतर सर्वंकष असा हा मसुदा लोकसभेत आणि राज्यसभेत सादर करावा, असा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही विधेयके आम्ही लोकसभा आणि राज्यसभेत मांडणार आहोत. त्याआधी नवी दिल्लीत पुन्हा एक चर्चासत्र ठेवले जाणार आहे. त्याला सगळ्याच राजकीय पक्षांना निमंत्रण करण्यात येणार आहे. तसेच येत्या १९ जानेवारीला मुंबईत याअनुषंगाने एक दिवशीय चर्चासत्र ठेवण्यात आले आहे. त्याला उच्च न्यायालयातील वकिलांना चर्चेसाठी निमंत्रित केले आहे. प्रत्येक राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी अशी चर्चा घडवून आणत आहोत, असेही शेट्टी यांनी स्पष्ट केले.

प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारीला मुंबईत होत असलेल्या संविधान बचाव आंदोलनाबाबत खासदार राजू शेट्टी म्हणाले, गेट वे ऑफ इंडियाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ दोन तास मूक धरणे आंदोलन केले जाणार आहे. घटना वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहनही श्री. शेट्टी यांनी केले.

# प्रत्येक गावाला ग्रामपंचायत कार्यालय मिळणार : पंकजा मुंडे



**मुंबई (प्रतिनिधी)**: स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मृती ग्रामपंचायत कार्यालय व महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना महाराष्ट्र शासनाकडून ग्रामपंचायत कार्यालयासाठी १२ लाख रुपये निधी देणार असल्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला असल्याची माहिती ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. या वेळी राज्यमंत्री दादा भुसे हेदेखील उपस्थित होते.

यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची माहिती मुंडे यांनी या वेळी दिली. यासोबतच ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी देखील योजनेला मान्यता मिळाली असून, त्यासाठीही ५ कोटींची तरतूद केली असल्याची माहिती मुंडे यांनी दिली. त्यामुळे राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला आता प्रशस्त ग्रामपंचायत कार्यालय मिळणार आहे.

राज्यात एकूण २८ हजार ग्रामपंचायती असून, ४,२४२ ग्रामपंचायतींना स्वतःचे कार्यालय नसल्याचे भुसे यांनी या वेळी सांगितले. या ग्रामपंचायतींना योजनेअंतर्गत कार्यालय देणार असल्याचे ते या वेळी म्हणाले. १००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना महाराष्ट्र शासनाकडून १२ लाख रुपये निधी दिला जाणार आहे. ग्रामसचिवालयांसाठी याआधी केंद्राकडून अनुदान मिळायचे मात्र ते दोन वर्षांपासून अनुदान बंद झाले असल्याचे भुसे यांनी या वेळी सांगितले.

## अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात एक टक्का समांतर आरक्षण

**मुंबई (प्रतिनिधी)**: अनाथ मुलांना नोकरीमध्ये खुल्या प्रवर्गात एक टक्का समांतर आरक्षण देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

अनाथ मुलांना सरकारी नोकऱ्यांमध्ये अर्ज भरताना किंवा परीक्षांच्या वेळी जातीच्या कॉलममुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने त्यांचा कोणत्या विशेष प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. त्यामुळे अनाथ मुलांना आरक्षण लागू करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

# शेतकरी मोडला तर राज्य उद्ध्वस्त होईल : अजित पवार

**भूम, जि. उस्मानाबाद (प्रतिनिधी )** : शेतकरी मोडला तर राज्य उद्ध्वस्त होईल. बाजार उद्ध्वस्त होईल आणि राज्याचे आर्थिक कंबरडे मोडून पडेल. तसे होऊ नये यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसने हे हल्लाबोल आंदोलन सुरू केल्याचे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी सांगितले.

भूम येथे बुधवारी (ता. १७) हल्लाबोल मोर्चात आयोजित सभेत ते बोलत होते. सभेला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, धनंजय मुंडे आदींची उपस्थिती होती.

श्री. पवार म्हणाले, की राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली, मात्र ऑनलाइन घोटाळ्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदाच झाला नाही. शेतकरी, शेतमजुरांची अवस्था वाईट झाली आहे.

ज्या जनतेने यांना मोठ्या अपेक्षेने निवडून दिले, तीच जनता यांना घरी बसविल्याशिवाय राहणार नाही. तसेच शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन अधिकाऱ्यांनी तोडू नये, आमचे सरकार आल्यास आम्ही शेतकऱ्यांना सौरऊर्जेवरील वीज पंप देऊ, असे श्री. पवार यांनी सांगितले.




सकाळ अॅग्रोवन — आयोजित | महाधन एक अतूट नातं ! — प्रायोजित

अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

**शुक्रवार, १९ जानेवारी २०१८**

**उस्मानाबाद**

विषय - ऊस व्यवस्थापन व हरभरा किडरोग नियंत्रण
वक्ते - डॉ. प्रविण चव्हाण (सहा. प्रा. कृषी महाविद्यालय, उस्मानाबाद)
श्री. ए. जी. देशमुख (तालुका कृषी अधिकारी, उस्मानाबाद)
स्थळ - ग्रामपंचायत सभा मंच, काजळा, ता. जि. उस्मानाबाद, वेळ - सकाळी ८.०० वा.

**नांदेड**

विषय - केळी पीक व्यवस्थापन
वक्ते - डॉ. एस. व्ही. धुतराज (शास्त्रज्ञ, केळी संशोधन केंद्र, नांदेड)
प्रा. आर. व्ही. देशमुख (शास्त्रज्ञ, केळी संशोधन केंद्र, नांदेड)
स्थळ - आत्माराम महाराज मठ संस्थान, मगट, ता. मुदखेड, जि. नांदेड, वेळ - सकाळी ९ वा.

**शनिवार, २० जानेवारी २०१८ (हिंगोली)**

विषय - भुईमूग पीक व्यवस्थापन
वक्ते - श्री. प्रा. राजेश भालेराव
(विषय विशेषतज्ज्ञ, कृषी विद्या, केव्हीके, तोंडापूर)
स्थळ - मारुती मंदिर, चिमेगाव, ता. औंढा, जि. हिंगोली
वेळ - सकाळी ८.३० वाजता

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

